# प्रकरण पाचवे

## खुजगांव की चांदोली ? धरणाच्या जागेद्दलचे राजकारण

## टीकात्मक परिक्षाण

## प्रकरण पाचवे

## खुजगांव की चांदोली ? धरणाच्या जागेबद्दलचे राजकारण

## टीकात्मक परिक्षण

### प्रस्ताविक :

भारताच्या ग्रामीण व शेती विकासाच्या क्षेत्रामध्ये धरणांची महत्वाची भूमिका आहे. शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने देशभर लहान मोठ्या प्रमाणात धरणे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. विकासाच्या राजकारणामध्ये निरनिराळी धरणे व पाटबंधारे प्रकल्प बांधुन त्याद्वारे हरितक्रांती घडवून आणने हा एक महत्त्वाचा कार्यक्रम ठरला. त्यामुळे वेगवेगळया राजकीय पुढा-यांच्यामध्ये धरण बांधणीसाठी व धरण बांधावयाचे झाले तर कोठे बांधावयाचे याबाबत संघर्ष निर्माण झाला. प्रत्येक पुढारी आपल्या मतदार संघाचा विचार करुन आपल्या भागात धरण कसे बांधता येईल व त्याचा फायदा आपल्या मतदार संघाला कसा करुन घेता येईल यासाठी संघर्ष करु लागला. त्यामुळे राजकीय पुढा-यांची प्रतिष्ठा व लोकप्रियता वाढून त्यांचे स्थान बळकट होणार होते. अशा पध्दतीचे वाद महाराष्ट्रात झाले. द. महाराष्ट्रातील वारणा धरणाचा वाद त्यापैकीच एक होता. वारणा नदीवर धरण बांधण्याचा निर्णय केंद्राने व राज्य सरकारने १९६६ मध्ये घेतला. प्रथम वारणा नदीवर खुजगांव या ठिकाणी मोठे म्हणजे ९० टी.एम्.सी. पाणी साठा होईल असे धरण बांधण्याचा निर्णय झाला. पुढे या धरणाच्या विकासात राजकारण शिरले. महाराष्ट्रातील दोन अत्यंत महत्वाचे पुढारी श्री राजारामबापू पाटील व श्री वसंतदादा पाटील यांच्यामध्ये धरणाच्या

जागेबाबत मतभेद झाले. हे मतभेद दोघांच्या राजकीय जीवनाबाबत महत्वाचे ठरले. राजारामबापू पाटील व वसंतदादा पाटील या दोघांचे राजकीय जीवन जवळ जवळ १० वर्षे या प्रश्नाभोवती फिरत होते. आणि नंतरची दहा वर्षे तर त्यांच्यात मोठाच राजकीय संघर्ष झाला.

## ५.२ खुजगांव धरणाच्या जागेचे राजकारण :

१९६६ साली केंद्र सरकार व राज्य सरकारने वारणा नदीवर शिराळा तालुक्यातील खुजगांव या ठिकाणी धरण बांधण्यास मान्यता दिली. याचा सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांचा फायदा होणार होता. परंतु हे धरण कोठे बांधावयाचे याबाबत पुढे जिल्हयातील पुढा-यांच्या मध्ये मतभेद झाले. श्री राजारामबापू पाटील यांना हे धरण शिराळा तालुक्यातील खुजगांव येथे व्हावे असे वाटते होते तर श्री वसंतदादा पाटील यांना हे धरण शिराळा तालुक्यातील चांदोली या ठिकाणी व्हावे असे वाटत होते. या काळात श्री वसंतदादा पाटील ग्रामीण भागातील महत्वाचे पुढारी होते. तसेच त्याचे सहकार क्षेत्रामध्येही मोठे कार्य होते. त्यांना सहकारी साखर कारखा-न्याचा पाठिंबा होता. १९७० नंतर या दोन्ही पुढा-यांचेमध्ये राजकीय मतभेद जास्त तीव्र झाले. जिल्हयातील राजकारणात त्यांचे निरनिराळे गट निर्माण झाले. त्यामुळे धरणाच्या जागेचा प्रश्न गटबाजीच्या राजकारणात सापडला. या वादाबाबत श्री बापू यांनी राजकीय चळवळी सुरु केल्या. आंदोलने उभी केली. निरनिराळ्या चळवळीद्वारे निर्णय प्रक्रियेवर व शासनावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला.

श्री. राजारामबापू पाटील यांचे मत असे होते की, हे धरण खुजगांव येथे बांधल्यामुळे कोल्हापूर, सांगली व सोलापूर जिल्हयातील शिराळा, वाळवा, शाहूवाडी व पंढरपूर या तालुक्यातील २।। लाख एकर जमिनीला पाणी

मिळेल.[१] कुजगांव येथे ९० टी.एम्.सी. पाणी साठा होणारे मोठे धरण बांधून कालव्याच्या साह्याने पाणी शेतीला देवून ओलिताखाली आणता येईल. कालव्याने पाणी दिल्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होवून त्यांना अत्यल्प दराने व शासकीय खर्चाने पाणी मिळेल. धरणाच्या कामासाठी कालव्यासहीत ७२ कोटी रुपये खर्च येणार होता व शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी एवढा खर्च करणे आवश्यक आहे असे बापूंचे मत होते.

श्री वसंतदादा पाटील यांच्या मते हे धरण चांदोली येथे व्हावे आणि कारण जलसिंचनाची उपसा सिंचन पध्दती ही कालवा सिंचन पध्दतीपेक्षा जास्त चांगली आहे. कारण कालवा सिंचनामुळे शेतीला आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी मिळते व जमिनीचे नुकसान होते. तर कुजगांव येथे धरण बांधले तर सुमारे १०,००० हेक्टर्स जमिन धरणाच्या पाण्याच्याखाली जाणार होती व सुमारे ३२ गांवे उठवावी लागून सुमारे १०,००० लोकांचे पुनर्वसन करावे लागणार होते. परंतु हे धरण चांदोली येथे झाले तर ३२ कोटी रुपये खर्च येवून फार थोडीच गावे उठवावी लागणार होती. त्यामुळे पुनर्वसनाचा खर्च फारसा येणार नव्हता.[२] प्रामुख्याने धरणाच्या वादाच्या स्वरुपात वरील मुद्दे पुढे आले होते.

## ५.३ वसंतदादांचा वाढता प्रभाव :

१९७० नंतर सांगली जिल्ह्याच्या राजकारणामध्ये मोठ्याप्रमाणात बदल होण्यास सुरुवात झाली. श्री वसंतदादांचा प्रभाव वाढू लागला. तर राजारामबापूंचा प्रभाव कमी होवू लागला. १९६९ साली वसंतदादा पाटील महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. तर १९७२ च्या विधानसभा निवडणुकीनंतर वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात वसंतदादा पाटील क्रमांक दोनचे मंत्री म्हणून सामील झाले. त्यांच्याकडे पाटबंधारे खाते देण्यात आले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्याचबरोबर श्री राजारामबापू पाटील यांना मंत्रीमंडळातून वगळण्यात आले. या ठिकाणी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील यांचा चढउताराचा राजकीय आलेख. सुरुवातीस राजाराम-बापू पाटील हे सरळ उच्चपदावर गेले तर वसंतदादा पाटील हळूहळू वर चढत गेले. राजारामबापू पाटील १९५१ साली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. त्यानंतर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष व १९५९ साली महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. नंतर लगेच १९६२ साली ते राज्यमंत्रीमंडळात उपमंत्री झाले. तर १९६३ मध्ये राज्यमंत्रीमंडळात कॅबीनेट मंत्री झाले. म्हणजे राजाराम-बापूंना वरची राजकीय पदे झपाटयाने मिळत गेली. परंतु तशीच त्यांच्या राजकीय जीवनाला उतरती कळा ही लवकर लागली. श्री वसंतदादा पाटील सुरुवातीला अनेक वर्षे स्थानिक म्हणजे जिल्हापातळीवरच काम करत होते. १९६९ साली श्री वसंतदादा पाटील महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. तर १९७२ ला राज्यमंत्री मंडळात ते पाटबंधारे खात्याचे कॅबीनेट मंत्री झाले. म्हणजे राजारामबापूंच्या नंतर तब्बल १० वर्षांनी वसंतदादांना मंत्री मंडळात स्थान मिळाले. परंतु त्याचे मंत्रीमंडळातील स्थान दीर्घकाळ राहीले. कारण पुढे ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री बनले व बरीच वर्षे हे पद त्यांनी सांभाळले. म्हणजेच वसंतदादा पाटील हळूहळू वर चढत गेले परंतु राजारामबापूंना उच्चपदे जेवढया लवकर मिळाली तेवढयाच लवकर त्यांना त्याचा त्याग करावा लागला.

## ५.४ खुजगांव जनतेची चळवळ :

श्री राजारामबापू मंत्रीमंडळात असल्यापासून खुजगांव धरणाचा आग्रह धरत होते. त्यांना मंत्रीमंडळातून वगळल्यानंतरही त्यांनी जनतेचा आमदार म्हणून विधायक कार्य केले. विधानसभेत त्यांनी जनतेच्या जिव्हाळयांचे अनेक प्रश्न मांडले. त्यावेळी खुजगांव प्रश्नही धसास लावला. राजारामबापूंना

मंत्रीमंडळातून काढल्यानंतर खुजगांव प्रश्नाबाबत त्यांची ताकत कमी पडू लागली. कारण हातात सत्ता असल्याशिवाय असे प्रश्न धसास लावणे अवघड जाते. राजारामबापू मंत्रीमंडळात असताना वारणा प्रकल्पाबाबतचा प्रत्येक निर्णय खुजगांवच्या बाजूने लागत असे.[3] परंतु राजारामबापूना मंत्रीमंडळातून काढले गेले व ते साधे आमदार झाले. यावेळी श्री वसंतदादा पाटील यांना मंत्री मंडळात घेतले गेले व त्यांच्याकडे पाटबंधारे खाते सोपविण्यात आले. वसंतदादा मंत्री झाल्यामुळे निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची त्यांची शक्ती वाढली. कारण आता सत्ता श्री वसंतदादा पाटील यांच्या हातात होती.

श्री वसंतदादा पाटील सत्तेत तर श्री राजारामबापू पाटील सत्तेबाहेर त्यामुळे धरणासाठी राजारामबापूवर संघर्ष करावा लागला. शासनाच्या निर्णय प्रक्रियेवर दबाव आणण्यासाठी श्री राजारामबापूनां जनतेत जावे लागले. त्यामुळे त्यांनी खुजगांव धरण बांधण्यासाठी राजकीय चळवळ सुरु केली. सभा घेतल्या. मोर्चे काढले, निदर्शने केली. सरकारच्या निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी १७ जून, १९७३ रोजी इस्लामपूर येथे खुजगांव धरण परिषद आयोजित करण्यात आली. त्यासाठी सांगली व कोल्हापूर जिल्हयातील गांवामध्ये जावून तेथील कार्यकर्त्यांनी खुजगांव धरणाची माहिती दिली व खुजगांव धरण योजना का पूर्ण होणे आवश्यक आहे हे पटवून दिले. त्यासाठी सभा, संमेलने, भेटीगाठी, चर्चासत्रे, पॉम्पलेटस्, पोस्टर्स अशा विविध मार्गांचा अवलंब करुन राजारामबापूनी शेतकऱ्यांना जागृत केले. १७ जून १९७३ रोजी झालेल्या खुजगांव धरण परिषदेला जवळ १ लाख ते १।। लाख लोक हजर होते. या परिषदेचे अध्यक्ष रत्नाप्पाआण्णा कुंभार होते. तर दोन्ही जिल्हयातील अनेक मान्यवर व्यक्ती यावेळी हजर होत्या. यात प्रामुख्याने श्री तात्यासाहेब कोरे श्री बाजीराव पाटील, श्री यशवंतराव मोहिते, श्री विश्वासराव पाटील, श्री विलासराव शिंदे, श्री डी.डी. पाटील, श्री बाबासाहेब पाटील इ.

ख-या अर्थाने लोकांची चळवळ बनविण्यात राजारामबापूना यश आले. याबाबत श्री शांताराम गरूड लिहितात, "खुजगांव धरणाची मोहीम ही बापूंच्या राजकीय जीवनातील सर्वात महत्वाची घटना आहे. तिच्यात त्यांच्या बंडखोरीचे व संघटना कुशलतेचे दर्शन आहे. त्याहीपेक्षा अधिक त्यांनी त्यासंबंधीचा जो अभ्यास केला त्याला महत्व आहे." १९६६ पासून र रेंगाळत पडलेल्या योजना निर्णय १९७४ मध्ये तडजोडीच्या रूपाने लागला.

## ५.५ तडजोड :

श्री वसंतदादा पाटील यांनी या धरणाच्या वादाबाबत ठाम भूमिका घेतली होती. त्यांचा खुजगांवला पूर्ण विरोध होता. तसेच त्यानी कालवा सिंचन नाकारून उपसा सिंचनाचा मार्ग स्वीकारला होता. खुजगांवमुळे जास्त जमिन धरणाच्या पाण्याखाली जावून मोठया प्रमाणात पुनर्वसन करावे लागणार आहे. त्यामुळे त्याच्या खुजगांव धरणाला विरोध होता व या भूमिकेशी ते शेवटपर्यंत ठाम होते. खुजगांव धरण परिषद झाल्यानंतर व बापूनी मोठी चळवळ उभी केल्यानंतर वसंतदादांनी राजाराम बापूना बोलावून त्यांच्याशी या वादाबाबत चर्चा केली व त्यांच्यापुढे तज्ज्ञांनी सर्व्हे करून योग्य आहे असे सांगितलेल्या चांदोलीचा पर्याय व आराखडा ठेवला व राजारामबापूंच्या इच्छे-प्रमाणे जेवढे क्षेत्र खुजगांवमुळे ओलिताखाली येणार आहे तेवढे क्षेत्र चांदोलीमुळे भिजवून देतो असे आश्वासन दिले. तेवढे क्षेत्र भिजवून देण्याच्या दृष्टीने कालवा व उपसासिंचन या दोन्ही मार्गांचा स्विकार केला.

हा वाद मिटविण्यामागे यशवंतराव चव्हाण यांनीही महत्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या मते धरणाच्या पाण्याखाली कमी जमिन जाणारी जागा निवडा असा सल्ला यशवंतराव चव्हाण यांनी श्री वसंतराव नाईक

मुख्यमंत्री व वसंतदादा पाटील पाटबंधारे मंत्री यांना दिला होता. खुजगांव मुळे जाणारा बिळाशी ते पटेलोंड हा पट्टा त्याना पसंत नव्हता. स्वातंत्र्यपूर्व कालातील बहुतांशी चळवळी येथे निर्माण केल्या गेल्या होत्या. व श्री यशवंतराव चव्हाण स्वत: या भागात भूमिगत होते. त्यामुळे त्याना ही जागा पसंत नव्हती. म्हणून त्यांनी धरणाच्या पाण्याखाली कमी जागा जाणारी व पाण्यामुळे जास्त जमिन ओलिताखाली येणारी जागा निवडा अशा प्रकारच्या सूचना या वादाबाबत यशवंतराव चव्हाण यांनी दिल्या होत्या. [४]

## ५.६ तडजोडीचे मुद्दे :

वारणा धरण प्रकल्पाच्या वादाबाबत तडजोड झाली. बहुतेक ज्या वादांना राजकीय स्वरुप प्राप्त होते त्या त्या ठिकाणी तडजोडी झालेल्या दिसतात. त्यामुळे या वादाबाबत ही तडजोड होवून निर्णय लागला. या तड-जोडीमध्ये खालील मुद्दयांचा विचार करुन तडजोड करण्यात आली.

१) राजारामबापूंच्या मते खुजगांवमुळे जेवढे क्षेत्र ओलिताखाली येणार आहे तेवढे क्षेत्रा ओलिताखाली आणले तर धरणाच्या जागेबाबत कोणताच वाद असण्याचे कारण नाही. त्याला अनुसरुन चांदोली येथे धरणाची जागा निवडून खुजगांव एवढे क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

२) संपूर्ण वाळवा तालुका ओलिताखाली यावा अशी बापूंची इच्छा होती. ती वसंतदादा पाटील यांनी मान्य केली.

३) त्या भागातील बड्या बागायतदारांना ही योजना नको आहे. कारण त्यामुळे कमाल जमीन धारणेखाली त्यांची जमीन जाईल अशी त्यांना भीती वाटते असे बापूंचे मत होते. पण याबाबत त्यांना तडजोड करावी लागली.

४) श्री वसंतदादांच्या मते कुजगांवमुळे जास्त व सुपीक जमिन धरणाच्या पाण्याखाली जाणार होती व अनेक गांवे उठवावी लागणार होती. व शासनाला त्यांचे मोठया प्रमाणात पुनर्वसन करावे लागणार होते. त्यावर मोठया प्रमाणात पैसा खर्च होणार होता. या तडजोडीमुळे वसंतदादांचा वरील मुद्दा मान्य झाला.

५) श्री वसंतदादांच्या मते कालव्यामुळे शेतीला जास्त पाणी जावून शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होणार होते व कालव्याला खर्च मोठया प्रमाणावर होतो. चांदोली धरणामुळे कालवा व उपसा सिंचन या दोन्ही मार्गांचा स्वीकार करुन तडजोड करण्यात आली.

६) राजारामबापूंनी उपसा सिंचनाला विरोध करुन कालव्याने पाणी देण्याच्या तत्वाचा पुरस्कार केला. त्यातील कालव्याबाबतचे त्यांचे विचार वसंतदादांनी मान्य केले आणि चांदोलीला कालव्याची तरतूद केली. पण उपसा सिंचनाचीही तेथे तरतूद केली होती. त्यामुळे धरणाचा खर्च वाढला.

थोडक्यात धरणाची पर्यायी जागा म्हणून चांदोलीचा स्वीकार करतांना श्री राजारामबापू पाटील व श्री वसंतदादा पाटील यांनी जे मुद्दे सुचविले ते दोन्ही बाजूंचे मुद्दे या तडजोडीमध्ये स्वीकारले गेले. या तडजोडी-मुळे श्री वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील यांना पन्नास पन्नास टक्के यश मिळालेले दिसते.

## ५.७ सध्याच्या चांदोली धरणाचे स्वरुप :

तडजोडी नंतर चांदोली या ठिकाणी धरण बांधण्याचा निर्णय घेतला गेला. मागील प्रकरणामध्ये श्री वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील यांनी पुरस्कार केलेले धरण व त्याचे गुणदोष आपण पाहिले आहेत. तर

तडजोडी नंतरच्या चांदोली धरणामध्ये प्रामुख्याने पुढील प्रमाणे फायदे होताना दिसतात.

सध्याचे चांदोली धरण :            तालिका ६.

| अ.नं. | तपशील | होणारा फायदा |
|---|---|---|
| १) | एकूण पाणी साठा | ३५ हजार द.ल.घ. फूट |
| २) | डेड वॉटर | ६.५० हजार द.ल.घ. फूट |
| ३) | धरणाच्या पाण्याखाली बुडणारी जमिन. | ११,२६० एकर |
| ४) | ओलिताखाली येणारी जमिन | २,८६,३४० एकर |
| ५) | एकूण खर्च (सुधारीत) | रुपये ३२६.२९ कोटी. |
| ६) | सिंचन प्रकार | कालवा व उपसा सिंचन |
| ७) | पुनर्वसन | ७०२६ |
| ८) | उठणारी गांवे | २७ (१८ गावे, ९ वाडया) |
| ९) | वीज निर्मिती | १६ मेगॅवॅट |
| १०) | धरणाचे आयुष्य | २०० वर्षे |

५

श्री वसंतदादांनी पुरस्कृत केलेले धरण आणि तडजोडी नंतरचे चांदोली धरण यामध्ये पुढीलप्रमाणे फरक दिसतो. या धरणामध्ये ३१ हजार द.ल.घ.फूट एवढा साठा होणार होता तर सध्याच्या चांदोली मध्ये ३५ हजार द.ल.घ. फूट एवढा साठा होणार आहे. दोन्हीकडे डेड वॉटरचा अत्यल्प प्रमाणात साठा होणार आहे. सध्याच्या चांदोलीमुळे ११,२६० एकर जमिन धरणाच्या पाण्याखाली बुडणार आहे. तर पूर्वीच्या धरणाखाली ५,८००

एकर जमिन धरणाच्या पाण्याखाली बुडणार होती. तर दोन लाख एकर जमिन ओलिताखाली येणार होती. सध्याच्या चांदोलीमुळे २,८६,३४०/- एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. दोन्ही धरणाच्या खर्चाचा विचार करताना मात्र सध्याच्या खर्चात फार मोठा फरक पडलेला दिसतो. हा खर्च ५० कोटी रुपयांवरुन १९७६ ला ८१ कोटी रुपये होणार होता. आता नव्या अंदाजाप्रमाणे या धरणास सुमारे तीनशे कोटी रुपये खर्च होईल. पुनर्वसन व पुनर्वसनाचा खर्च जवळ जवळ दोन्ही धरणाबाबत सारखाच दिसतो. अंदाजे १०,००० लोकांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. वसंतदादानी पुरस्कृत केलेल्या धरणासाठी फक्त उपसा जलसिंचनाची योजना होती. तर सध्याच्या चांदोली धरणामध्ये उपसा व पाट या जलसिंचनाच्या दोन्ही योजना निर्माण करण्यात आल्या आहेत. धरणाचे जीवनमान दोन्हीकडे २०० वर्षाचे आहे. परंतु उपसा योजनेचे जीवनमान मात्र ५० वर्षे आहे. इत्यादी फरक दादांनी पुरस्कृत केलेल्या धरणामध्ये व सध्याच्या चांदोली धरणामध्ये दिसतो.

## ५.८ धरणाच्या जागेच्या वादाचे राजकीय स्वरुप :

खुजगांव धरणाचा वाद महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात गाजला. १९७५ साली याबाबत तडजोड झाली. धरणाच्या जागेचा वाद मिटला पण वसंतदादा पाटील आणि राजारामबापू पाटील यांच्यातील मतभेद जास्त तीव्र झाले.

या वादाच्या संदर्भात अंतिम निर्णय घेत असतांना खालील काही प्रश्न धसास लागले आणि निर्णय होण्याच्या प्रक्रियेचे राजकीय स्वरुप स्पष्ट झाले.

१) श्री. राजारामबापू पाटील यांनी मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने वारणा प्रकल्पाची बाजू उचलून धरली. त्यासाठी मोठी राजकीय

चळवळ केली. त्यामुळे चांदोली धरणाच्या या स्थाने हा प्रकल्प प्रत्यक्षात आला.नाही तर वादग्रस्त धरण म्हणून त्याकडे दुर्लक्ष झाले असते.

२) महाराष्ट्राच्या राजकारणात राजारामबापू पाटील जो पर्यंत मंत्री होते तो पर्यंत खुजगांव ही जागा सरकारला मान्य होती. परंतु त्यांचे मंत्रीपद जाताच ही जागा वादग्रस्त ठरली. पुढे वसंतदादा पाटील पाटबंधारे मंत्री झाल्यानंतर चांदोलीची जागा सरकारने मान्य केली. यावरून धरणाची जागा ठरविण्यामध्ये राजकीय नेतृत्वाचा केवढा मोठा सहभाग असतो हे आपल्या लक्षात येईल.

३) श्री वसंतदादा पाटील व श्री राजारामबापू पाटील यांच्यामध्ये धरणाच्या जागेबाबत तडजोड झाली. परंतु या तडजोडीमध्ये वसंतदादा पाटील यांचा वरचष्मा राहीला. कालव्याच्या साहयाने पाणी पुरवा ही राजाराम-बापूंची मागणी मान्य झाली. राजारामबापूनी खुजगांवच्या बाजूने अभ्यास-पूर्ण व साधार असे मुद्दे मांडले होते. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे आणि काही तांत्रिक अडचणी पुढे करून चांदोलीची जागा निवडण्यात आली.

४) या वादामध्ये कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी ही हस्तक्षेप केला. यशवंतराव चव्हाण यांनी दोन्ही गट व पुढारी यांना एकत्र बसून जागेबाबत निर्णय घेण्याचे सांगीतले. यशवंतराव चव्हाण यांच्या सल्ल्यामुळे ही तडजोड होणे शक्य झाले.

५) खुजगांव धरणाच्या वादामुळे १९६६ साली मंजुर झालेल्या कामकाजास तब्बल दहा वर्षांनी सुरूवात झाली. धरणाच्या कामामध्ये हा जो उशिर झाला त्यामुळे सांगली जिल्ह्यातील शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. या धरणाच्या जागेबाबत तडजोड झाल्यानंतर मोठया प्रमाणात धरणाचा

खर्च १९७६ साली ८१.९७ कोटी इतका अपेक्षीत होता. १९८८ पर्यंत प्रकल्पाचा सुधारीत खर्च २८८.४७ कोटी अपेक्षीत आहे. सद्या या धरणा-साठी सुमारे ३०० कोटी रुपयापेक्षा जास्त खर्च येईल. धरणाच्या बांध-कामास उशिर झाला की, धरणाचा खर्च वाढतो, हे तत्व येथे लागू पडते.

दरम्यानच्या काळामध्ये सांगली जिल्हयातील वेगवेगळया साखर कारखान्यांनी उपसा सिंचन पध्दतीने आपल्या क्षेत्रामध्ये पुरवठा सुरुवात केली. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याने वाळवे तालुक्यातील सुमारे ४९,००० एकर जमिन ओलिताखाली आणली आहे. त्यामुळे कालव्याने पाणी पुरवठा करणाऱ्या मोठया धरणाची आज तेवढी गरज राहिली नाही.

## ५.८ खुजगांव आंदोलन आणि राजारामबापूंचे नेतृत्व :

खुजगांव धरणाच्या वादामुळे श्री राजारामबापू पाटील यांचा नेतृत्वाचे लढावू गुण लोकांच्या लक्षात आले आणि त्यानंतरची दहा वर्षे सांगली जिल्हा व महाराष्ट्राच्या राजकारणात राजारामबापूंनी गाजवली. खुजगांव धरणाच्या वादामध्ये सुरुवातीला वसंतदादा पाटील यांनी चांदोलीच्या बाजूने बाजी मारली. परंतु दोन महिन्यातच श्री वसंतराव नाईक यांचे मंत्रीमंडळ गडगडले व त्यांच्या जागी श्री शंकरराव चव्हाण व राजारामबापूंचे जवळचे संबंध होते. पुढे आणिबाणीची घोषणा झाली आणि वसंतदादाना मंत्रीमंडळातून काढण्यात आले. वसंतदादांनी उद्वेगाने, राजकारणातून सन्यास जाहीर केला. चांदोलीच्या भूमीपूजनाला स्वत: मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण हजर होते. परंतु वर्षाभरातच राजकीय परिस्थिती पुन: बदलली. मार्च, १९७७ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला. दिल्लीत जनता पक्ष सत्तेवर आला. वसंत-दादांनी पुन्हा राजकारणात प्रवेश केला. यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या मदतीने त्यांनी शंकरराव चव्हाणांची उचलबांगडी केली.

त्या सत्ता संघर्षात राजारामबापूनी श्री शंकरराव चव्हाण यांना साथ दिली. मे १९७७ मध्ये वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्याच दिवशी राजारामबापूनी काँग्रेसचा त्याग करुन जनता पक्षात प्रवेश केला.

१९७७ पासून राजारामबापूनी जनता पक्षाच्या उभारणीसाठी कार्य केले. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत वाळवा मतदार संघातून विलासराव शिंदेनी त्यांचा पराभव केला. परंतु राजारामबापू जनता पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष झाले. शरद पवारांच्या पुलोद मंत्रीमंडळात ग्रामविकास मंत्री ही झाले. महाराष्ट्रातील विरोधी पक्षाच्या राजकारणामध्ये राजाराम-बापूंची भूमिका महत्वाची होती. परंतु त्यांच्या अकाली निधनामुळे विरोधी पक्षाच्या राजकारणाचे प्रचंड मोठे नुकसान झाले.

५.१० <u>धरणाच्या जागेच्या वादाची फलश्रुती</u> :

खुजगांव धरणाच्या जागेच्या वादामुळे जवळ जवळ ५ वर्षे महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले. सरकारच्या आणि काही राजकीय पुढाऱ्यांच्या चालढकलीच्या धोरणामुळे लाखोच्या संख्येने जनता संघटीत झाली आणि सरकारवर दबाव आणून वारणा नदीवर एक मोठे धरण बांधावयास जनतेने सरकारला भाग पाडले. विकासाच्या कार्यामध्ये जनतेचे होणारे हे संघटन एक विलक्षण बाब होती आणि राजारामबापूंच्या लढावू, अभ्यासू व दमदार नेतृत्वामुळे शक्य झाले. या वादामुळे लोकांच्या विकासाच्या उर्मी जागृत झाल्या. विकासाबाबत जागृत शेतकरीच विकास योजनांचा पुरेपुर फायदा घेवू शकतो.

श्री राजारामबापू पाटील यांच्या नेतृत्वाला या आंदोलनामुळे नवे तेज प्राप्त झाले. बापूंचा लढावूपणा, अभ्यासू वृत्ती, जनतेच्या सामर्थ्या-बाबत दृढ विश्वास या गोष्टी लोकांसमोर आल्या. खुजगांवच्या वादानंतर

बापूना काँग्रेसच्या राजकारणात तेवढे महत्वाचे स्थान राहिले नाही. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाल्यानंतर राजारामबापू पाटील काँग्रेसच्या बाहेर पडले. आणि नंतरची सहा सात वर्षे त्यांनी विरोधी पक्षाचे राजकारण केले. हे राजकारण करत असतांना विकासाबाबतचा त्यांचा आग्रह कायम राहिला आणि वाळवा सहकारी साखर कारखान्याने मोठी प्रगती केली. सांगली जिल्हातील दुष्काळी भागाचे प्रश्न त्यांनी लोकांसमोर मांडले आणि कवठेमहांकाळ, आटपाडी, खानापूर या तालुक्यामध्ये आपला राजकीय प्रभाव प्रस्थापित केला. सतत लोकांच्याबरोबर राहणे, लोकांचे प्रश्न हाती घेवून त्यासाठी संघर्ष करणे, निवडणूकीत पराभव झाला तरी नाउमेद न होता आपले काम चालू ठेवणे हे लोकशाही राजकारणाचे सूत्र त्यांनी अमंलात आणले. राजारामबापूच्या नेतृत्वाचा नवा पैलू लोकांच्या लक्षात आला.

कुंजगांव धरणाच्या बाबतीत श्री राजारामबापू पाटील व वसंतदादा पाटील यांच्यामध्ये तडजोड झाली. आणि दोघांचेही कांही मुद्दे मान्य करण्यात आले. परंतु या धरणाच्या संदर्भात बापूनी तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. ते मुद्दे आजही महत्वाचे वाटतात.

१] कालवा पद्धतीने जलसिंचन नैसर्गिकरित्या होते. व त्याला विजेची गरज भासत नाही. तर उपसासिंचन हे महागडे आहे.

२] कालवा पद्धतीच्या धरणांना कमाल जमिन धारणा लागू होईल म्हणून बडे जमिनदार विरोध करतात. कारण त्यात त्यांची जमिन जाते. बापूनी छोटया शेतक-यांचा प्रश्न हाती घेतला होता.

३] न्याय पाणी वाटपाचा प्रश्न ही आता ध्यास लागणार आहे. पाणी योग्य तेवढेच आणि मापून वापरावे लाभ क्षेत्रातील सर्व शेतक-यांना समान वाटप व्हावे आणि जमिनीचा कस कायम रहावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## तालिका ७

### श्री वसंतदादा पाटील पुरस्कृत व सध्याचे चांदोली धरण

| अ.क्र. | तपशील | वसंतदादांनी पुरस्कृत केलेले धरण | सध्याचे चांदोली धरण |
|---|---|---|---|
| १. | एकूण पाणी साठा | ३१ द.ल.घ.फूट | ३५ द.ल.घ.फूट |
| २. | डेड वॉटर | फारच कमी | ६.५० द.ल.घ.फूट |
| ३. | धरणाच्या पाण्याखाली बुडणारी जमिन | ५,८०० एकर | ११,२६० एकर |
| ४. | ओलिताखाली येणारी जमिन | जवळ जवळ २ लाख एकर | २,८६,३४० एकर |
| ५. | एकूण खर्च | ५० कोटी रुपये | रुपये ३२६.२९ कोटी (सुधारीत) |
| ६. | सिंचन प्रकार | उपसा सिंचन | कालवा व उपसा सिंचन |
| ७. | पुनर्वसन | ५,००० (अंदाजे) | ७,०२६ |
| ८. | उठणारी गांवे | १७ | २७ |
| ९. | वीज निर्मिती | कमी प्रमाणात | १६ मॅगॅवॅट |
| १०. | धरणाचे आयुष्य | २०० वर्षे | २०० वर्षे |

## प्रकरण पाचवे

## सं द र्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | पाटील शामराव (आण्णा) | : | मुलाखत, दि. १७.३.१९९३ |
| २) | पाटील छानबापू | : | मुलाखत, दि. २२.३.९३ |
| ३) | शिंदे विलासराव | : | मुलाखत, दि. २१.३.९३ |
| ४) | वरिलप्रमाणे | | |
| ५) | ढळक वैशिष्ठये<br>वारणा पाटबंधारे प्रकल्प. | : | महाराष्ट्र शासन, वारणा प्रकल्प, मंडळ, कोल्हापूर. |
| ६) | ठळक वैशिष्ठये,<br>वारणा पाटबंधारे प्रकल्प, | : | महाराष्ट्र शासन,<br>वारणा प्रकल्प मंडळ,<br>कोल्हापूर. |


......